671

जा.क्र.आमाजीआ/डीएचएस ८३/१५७९५- /९१
संचालनालय आरोग्य सेवा,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
दिनांक: २७ नोव्हेंबर, १९९१.

प्रति
जिल्हादंडाधिकारी,
_______________
जिल्हा – २९
पिन ________.

विषय: जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३[३] अन्वये उशिरा नोंदणी करण्यासाठी आदेश देण्यात कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ असण्याबाबत....

संदर्भ: या कार्यालयाचे पत्र क्र.आमाजिआ/डिएचएस ८३/१२२३.१९१२/८९ दिनांक ३०.१.१९८९.

वरील संदर्भीत पत्रान्वये जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९च्या कलम १३[३] व तदअंतर्गत महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम १९७६च्या १०[३] नुसार जन्म/मृत्यू घटना घडल्या तारखेपासून १ वर्षापेक्षा जास्त काल नोंदणीत उशिर झाल्या असल्यास अशी उशिरा नोंदणी कार्यकारी दंडाधिकारी वर्ग १ यांचे लेखी आदेशावरून व विलंब शुल्क रु.५/-घेऊन उशिरा नोंदणी करण्याची तरतूद असल्याचे खुलासा स्पष्टीकरण आपणास कळविण्यात आले होते. या बाबत राज्यातील ब-याच दंडाधिकारी कार्यालयाकडून कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ हे पद राज्यात कुठेही नसल्याचे निदर्शनात आणण्यात आले. तसेच कार्यकारी दंडाधिकारी [एक्झीक्युटीव्ह मॅजीस्ट्रेट] म्हणून पद धारण केलेले वर्ग १ या संवर्गातील पदे ज्या अधिका-यांनी धारण केली त्यांचेच कडून उशिरा नोंदणी संबंधीचे आदेश/सूचना कार्य करण्याचे काम फारच जिकिरीचे झाल्यामुळे सर्व सामान्य जनतेला जन्म मृत्यू घटनांची नोंदणी अधिनियम कलम १३[३] च्या अनुषंगाने उचित आदेश प्राप्त करून घेणे कालमर्यादा तसेच आर्थिक स्वरूपात खर्चिक स्वरूपाचे वाटत होते. त्यामुळे जन्म मृत्यू नोंदणीच्या घटना कलम १३[३] व नियम १०[३] च्या अन्वये करण्यात आदेश प्राप्त न झाल्याने संबंधित पालकांना/पाल्यांना गैरसोयीचे झाले.

वरील अडचणींचा विचार करून राज्य शासनाकडून तसेच या संचालनालयाकडून भारताचे महानिबंधक, नवी दिल्ली यांचे कडून त्वरीत खुलासा व निराकरण संबंधाने प्रकरण सादर केले होते. व या संबंधी भारताचे महानिबंधक, नवी दिल्ली यांचे कडून त्याचे पत्र क्र.1/14/86-VS(coord), dtd. 13/11/1991, अन्वये उशिरा जन्म मृत्यू नोंदणी संबंधी स्पष्टीकरण प्राप्त झाले. सोबत सदर पत्राचे प्रत जोडली आहे.

भारताचे महानिबंधक, नवी दिल्ली यांचे पत्रातील परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जन्म मृत्यू उशिरा नोंदणीचे आदेश देण्यास कोणतेही कार्यकारी दंडाधिकारी ( Any Executive Magistrate ) सक्षम असल्याचे स्पष्ट केले आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, या संचालनालयाचे पत्र क्र. आमा जिआ कक्ष ८ब/१२२३-१९१२/ दिनांक ३०.१.८९ देण्यात आलेल्या सूचना रद्द समजण्यात येऊन या पुढे जन्म मृत्यू नोंदणी संबंधी आपल्या अधिकारी क्षेत्रांत कार्यरत असलेले कार्यकारी दंडाधिकारी पदधारक अधिका-यांना आदेश देण्याचे लेखी सूचित करावे व त्यामुळे जन्म मृत्यू उशिरा नोंदणी संबंधी सर्व सामान्य जनतेस होणारी गैरसोय टाळता येईल. सदर पत्राची कृपया पोहोच द्यावी.

संचालक आरोग्य सेवा व
मुख्य निबंधक जन्म-मृत्यू, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

आवक ... दिनांक ... 1991 SAVS
कार्यवाही नोंद ...

प्रत, मा. माहितीसाठी सविनय
सचिव महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय, मुंबई.
सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.
प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
विभागीय आयुक्त[महसूल[१] कोकण मुंबई, २]पुणे ३] नाशिक ४] अमरावती ५] औरंगाबाद ६] नागपूर. [सर्व]
आयुक्त महानगरपालिका
प्रत सस्नेह माहितीसाठी व जरुर त्या तजविजीसाठी रवाना:
१] मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२] आरोग्य अधिकारी व निबंधक जन्म मृत्यू महानगरपालिका
३] उपसंचालक आरोग्य सेवा, प्रभारी आरोग्य मंडळ
प्रत माहितीसाठी व पुढील तजविजीसाठी:
१] उपसंचालक आरोग्य सेवा व उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू पुणे-१.
२] जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा निबंधक जन्म मृत्यू जिल्हा परिषद
३] मुख्याधिकारी/आरोग्य अधिकारी व निबंधक जन्म मृत्यू नगरपालिका ------ तालुका ------ जिल्हा -------- [४] तहसिलदार व दंडाधिकारी ------
५] कंटोनमेंट कार्यकारी अधिकारी व निबंधक, जन्म मृत्यू. ------ जिल्हा ------
६] गटविकास अधिकारी पंचायत समिती ------ जिल्हा ------
७] सहाय्यक संचालक आरोग्य सेवा, आरोग्य शिक्षण केंद्र, ४१४ब नातूबाग शनिवार पेठ पुणे यांना योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
८] वैद्यकिय अधिकारी, प्रभारी जिल्हा प्रशिक्षण टीम जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परीषद - यवतमाळ
प्रत माहितीसाठी:
प्राचार्य, विभागीय कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र ------
ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र ------ जिल्हा ------
जिल्हा ------
पोलीस प्रशिक्षण केंद्र ------ जिल्हा ------
पंचायत राज्य प्रशिक्षण केंद्र ------
26/12/91
...अधिकारी. कक्ष- ८१, ८१अ, ८२, ८२ अ, ८३, ८४, ८५, ८५अ, ८६